## नि.क्र. १० वरील आदेश

१. वादीतर्फे दाव्यामध्ये दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार दावा चालू असताना प्रतिवादी क्र. १ याने गुंतागुंत निर्माण करण्याच्या उद्‌देशाने दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र हनुमंत हरी धस यांचे हक्कात विक्री केलेले आहे. त्यामुळे त्यांना प्रतिवादी करणे आवश्यक झाले आहे. तसेच त्यामुळे दाव्यातील सरनाम्यात वादी क्र. ३ चे नावानंतर प्रतिवादी क्र. ४ म्हणून हनुमंत हरी धस, वय— ४२ वर्षे, धंदा—शेती, रा. धसपिंपळगाव, ता. बार्शी जि. सोलापूर म्हणून नोंद करणेस, तसेच दावा कलम १, २ मध्ये दुरुस्ती करणेस, दुरुस्ती अर्जानुसार मजकूर लिहीणे व उपकलम नमूद करुन ३अ, ८ड, ८इ, १३ड, १३इ, १३फ नमूद करुन त्यामध्ये दुरुस्ती अर्जानुसार मजकूर लिहीणे अशी प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक आहे. म्हणून सदरचा अर्ज वादीने दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी आपल्या म्हणण्यामध्ये अर्जास विरोध करताना दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरुपात बदल होणार आहे. शेवटी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी वादीने दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये दिलेल्या कथनाशी सुसंगत आणि स्पष्टीकरण देणारी आहे. प्रतिवादी क्र. १ ने दावा चालू असताना त्रयस्थ ईसमास दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र विक्री केलेली आहे. त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे जरुरीचे आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीत जर प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून वरील कारणमिमांसेअंती मी या मतास आलो की प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचे सर्व वादमुद्‌दे निकाली काढण्यासाठी आवश्यक व गरजेची आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:

नियमित दिवाणी दावा क्र. ६४९/२०२१
<u>अमोल आणि ईतर वि. रामेश्वर आणि ईतर</u>

**<u>आदेश</u>**

१) सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज रु. २००/— खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) वादीने विहित मुदतीत किंवा तत्पूर्वी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन त्याच्या प्रती दाव्यात दाखल कराव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JAHANGIR RASHEED PATHAN
Date: 2022.11.15 17:33:36 +0530

(ज. र. पठाण)

दिनांक : १४/११/२०२२ ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. V. Kokate (Grade III) |
| Court | :- | J.R. Pathan,3rd Jt. CJJD & JMFC,Barshi. |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 14/11/2022 |
| Order uploaded on | :- | 15/11/2022 |